# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# गृहपाठ

## बी. ए. राजकीय भूगोल

द्वितीय वर्ष (सत्र ४)

२०१६–१७

प्रती : १०००

# गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी पुढील सूचना वाचाव्यात व त्याप्रमाणे गृहपाठांचे काम करावे.

१. बी. ए. (विशारद) सामाजिकशास्त्रे या अभ्यासक्रमातील गृहपाठ लेखन हा महत्त्वाचा आणि अनिवार्य भाग आहे. गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्याने संबंधित विषयाचे पुस्तक वाचून मगच गृहपाठ लिहिणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा विषयाचा अभ्यास होतो. स्वयंअध्ययनाची सवय व्हावी व उत्तरपत्रिका लेखनाचा सराव व्हावा हाच गृहपाठ लेखनामागील हेतू आहे.

२. गृहपाठ लिहिताना पुस्तकातील मजकुराची केवळ नक्कल करू नये. विद्यार्थ्याने विषय समजून घेऊन गृहपाठ लिहिला आहे की नाही हे जाणीवपूर्वक पाहिले जाते आणि त्याप्रमाणे गुण दिले जातात.

३. गृहपाठ त्यांच्या अनुक्रमानुसार व सलग लिहावेत. एक गृहपाठ संपल्यावर ठळक रेघ मारून पुढील ओळीवर अथवा नव्या पानावर पुढील गृहपाठ लिहावा. उत्तरात लाल शाईचा वापर करू नये. योग्य समास सोडावा.

४. मोठ्या प्रश्नांचे उत्तर ४० ते ५० ओळीत असावे. गरजेनुसार जास्त चालेल. टीपा लिहा प्रत्येकी २०–२५ ओळीत उत्तरे असावे.

५. उत्तरात गरज नसताना १, २, ३....... असे आकडे घालण्याऐवजी योग्य परिच्छेद पाडावेत.

६. उत्तराला सुरुवात करताना प्रास्ताविक व उत्तराच्या शेवटी समारोप असेल तर ते उत्तर अधिक चांगले मानले जाते.

**७. सत्र ३ व सत्र ४ चे गृहपाठ एकत्रित दिलेले आहेत याची नोंद घ्यावी.**

८. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'क्षेत्रीय कार्य' अथवा उपक्रम हा प्रश्न घालण्यात आला आहे. त्यासाठी अवांतर वाचन व सद्यःस्थितीतील घडामोडींचे निरीक्षण आवश्यक आहे.

## गृहपाठ सादर करण्याची मुदत

| **सत्र** | **विना विलंबशुल्क** | **विलंब शुल्कासह** |
|---|---|---|
| तिसरे | ३१ ऑक्टोबर २०१६ | १५ नोव्हेंबर २०१६ |
| चौथे | १५ मार्च २०१७ | ३१ मार्च २०१७ |

# राजकीय भूगोल (GC-403)

**सत्र ४ : प्रकरण १ ते ५**

---

**प्र. १. राजकीय भूगोलाची स्वरूप आणि व्याप्ती स्पष्ट करा? (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** राजकीय भूगोलात भौगोलिक घटक व राजकारण यांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास केला जातो. राजकीय भूगोल हा विस्तृत व बहुविध पैलू असलेला विषय आहे..

**मुद्दे –** अ) राजकीय भूगोलाचे स्वरूप – १. राजकीय एक* २. पर्यावरण व समाज ३. राज्याचे परिवर्तनीय स्वरूप ४. परिणाम करणारे घटक १) स्थिर घटक २) अस्थिर घटक – लोकसंख्या, लोकांचे स्थलांतर, खनिजे, नवराष्ट्रांचा उदय. ब) राजकीय भूगोलाची व्याप्ती – १. राज्य व राष्ट्र यांचे भौगोलिक तादात्म्य २. राज्याची साधनसंपत्ती ३. लोकसंख्येची सामाजिक संलग्नता ४. राज्याचे मैत्रीसंबंध ५. व्यापार ६. गतिमानशास्त्र ७. विकास, समारोप.

**प्र. २. मर्मभूमी सिद्धांताची सविस्तर माहिती लिहा. (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** मॅकींडर यांनी मांडलेला मर्मभूमी सिद्धांत निसर्गवादावर व भूसत्ता व नाविक सत्ता यांच्या तौलनिक सामर्थ्यावर आधारलेला आहे.

**मुद्दे –** मॅकींडर मर्मभूमी सिद्धांताची मूलतत्त्वे, जागतिक इतिहासाचे कालखंड – नदीकृत कालखंड, भूमध्य सागरी कालखंड, साम्राज्य किंवा वसाहतीचा कालखंड, मर्मभूमी कालखंड, जागतिक भौगोलिक संघटना मर्मभूमी, अंतर्गत चापाकृती विभाग, बाह्यचापाकृती विभाग, समारोप.

**प्र. ३. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या. (कोणतीही २) (गुण : १५)**

**१) सीमाप्रदेशाचे प्रकार स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** सीमाप्रदेश हे भौगोलिक वा नैसर्गिक असतात. तो एक सरहद्दीचा विभाग असतो.

**मुद्दे –** सीमाप्रदेशाचे प्रकार – १. भौगोलिक सीमाप्रदेश २. राजकीय सीमाप्रदेश ३. सांस्कृतिक सीमाप्रदेश ४. प्राकृतिक सीमाप्रदेश ५. आंतरराष्ट्रीय सीमाप्रदेश.

**२) राष्ट्रनिर्मितीचे घटक लिहा.**

**उत्तर – प्रस्तावना –** राष्ट्रीयत्व ही एक आत्मीय भावना असते. लोकांच्या मनात ही भावना ज्या घटकांमुळे दृढ होते त्या घटकांनाच राष्ट्रनिर्मितीचे घटक म्हणतात.

**मुद्दे –** राष्ट्रनिर्मितीचे घटक – १. समान भूप्रदेश २. वांशिक एकात्मता ३. संस्कृती ४. भाषा आणि लिपी ५. इतिहास ६. समान राजकीय आकांक्षा ७. एकाच प्रकारचे आर्थिक हितसंबंध ८. एकात्म शासनसंस्था ९. राष्ट्रीयत्व, समारोप.

**३) भारत–चीन संबंध स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** भारताच्या शेजारील देशांपैकी चीन हा एक महत्त्वाचा देश आहे. भारत, चीन यांच्यात सांस्कृतिक आणि आर्थिक संबंध आहेत.

**मुद्दे –** भारत–चीन संबंध – सीमा

संबंध, राष्ट्राचा विस्तार, चीनची भूमिका, चीनचा साम्यवाद, मैत्रीपूर्ण संबंध, चीनने केलेली आक्रमणे, भारत–चीनमधील शिफारशी, भारत–चीन संबंध सुधारण्यासाठी केलेले प्रयत्न, दोन राष्ट्रांमधील व्यापार, समारोप.

**४) भूराजनीतीच्या उद्दिष्टांची कारणे विशद करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** भौगोलिक घटकांच्या अनुषंगाने ठरवले गेलेले संरक्षणविषयक धोरण म्हणजे भूराजनीती असे मानले जाते.

**मुद्दे –** १. निवासस्थान २. स्वयंपूर्णता ३. अखिल प्रदेश. ४. भू–सत्ता विरुद्ध नाविक सत्ता. ५) सीमाप्रदेश, इतर, समारोप.

**प्र. ४. टिपा लिहा. (कोणत्याही २)** **(गुण : १५)**

**१) राजकीय भूगोल व मानवी भूगोल.**

**उत्तर – प्रस्तावना –** राजकीय भूगोलाचा इतर शास्त्रांशी संबंध आहे. राजकीय भूगोल व मानवी भूगोल यांचा घनिष्ठ संबंध आहे..

**मुद्दे –** १. अध्ययनाचा आधार २. सीमारेषा ३. राजकीय व मानवी भूगोलाचा उद्देश ४. दृष्टिकोन, समारोप.

**२) सीमांचे कार्य**

**उत्तर – प्रस्तावना –** सीमा या शब्दाचा अर्थ मर्यादा असा होतो. राजकीय प्रदेशाची अंतिम मर्यादा ज्या रेषेने दाखवली जाते त्यास सीमा असे म्हणतात.

**मुद्दे –** सीमांचे काय १. संरक्षण २. सीमा प्रदेशातील नैसर्गिक संपत्तीची वाटणी ३. परिवहन ४. सीमा समस्या सोडवणूक, समारोप.

**३) किनारभूमी सिद्धांत**

**उत्तर – प्रस्तावना –** निकोलस जे स्पाइकमन यांनी किनारभूमी सिद्धांत मांडला आहे. किनरी प्रदेशाच्या भूमीला अधिक महत्त्व दिले आहे.

**मुद्दे –** किनारभूमी सिद्धांत – स्पाइकमन यांची विचारशैली, कडाभूमी/ काठभूमी/ किनारी भूमी, त्यातील गुणवैशिष्ट्ये, स्पाइकमन यांचा सत्ताविषयक दृष्टिकोन, या सिद्धांतांचे मूळ कारण, समारोप.

**४) उत्पत्तीनुसार सीमांचे वर्गीकरण**

**उत्तर – प्रस्तावना –** उत्पत्तीनुसार सीमांचे वर्गीकरणात सीमा व त्या भागातील सांस्कृतिक दृष्य यांचा परस्परसंबंधाचाही विचार केला जातो.

**मुद्दे –** १. पूर्वनिर्धारित सीमा २. स्वभावोद्‌भूत सीमा ३. पूवोरोपीत* सीमा ४. अविशिष्ट सीमा, समारोप.

**प्र. ५. कार्यक्षेत्र – भारत व महाराष्ट्र यांच्यातील फरक स्पष्ट करा.** **(गुण : २०)**

***